सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग
## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. ०७ नोव्हेंबर २०१७.

**ठाणे जिल्हा परिषदेसाठी**
**१३ डिसेंबरला मतदान**

मुंबई, दि.०७: ठाणे जिल्हा परिषद व त्यांतर्गतच्या पाच पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी तसेच इतर विविध ठिकाणच्या आठ रिक्त पदांच्या पोटनिवडणुकांकरिता १३ डिसेंबर २०१७ रोजी मतदान होणार असल्याची घोषणा राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे केली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, ठाणे जिल्हा परिषदेच्या ५३; तर त्यांतर्गतच्या शहापूर (जागा २८), मुरबाड (१६), कल्याण (१२), भिवंडी (४२) आणि अंबरनाथ (८) या पाच पंचायत समित्यांच्या एकूण १०६ जागांसाठी ही निवडणूक होणार आहे. मतदान केंद्रांची यादी व मतदार केंद्रनिहाय मतदार यादी २० नोव्हेंबर २०१७ रोजी प्रसिद्ध होईल. नामनिर्देशनपत्रे २३ नोव्हेंबर २०१७ ते २८ नोव्हेंबर २०१७ या कालावधीत स्वीकारली जातील. नामनिर्देशनपत्रे सादर करण्यासाठी संकेतस्थळाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

वाशीम जिल्हा परिषदेच्या पांगरी नवघरे (ता. मालेगांव) निवडणूक विभागाच्या रिक्त पदासाठीदेखील १३ डिसेंबर २०१७ रोजी मतदान होत आहे. चाणजे (ता. उरण, जि. रायगड), माटणे (ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग), पानेवाडी (ता. नांदगाव, जि. नाशिक), कोठली खु. (ता. नंदुरबार, जि. नंदुरबार), किल्लारी (ता. औसा, जि. लातूर), मलकापूर (ता. अकोला, जि. अकोला) आणि मार्डी (ता. मारेगाव, जि. यवतमाळ) या निर्वाचक गणांच्या रिक्त पदांच्या पोटनिवडणुकांसाठीदेखील १३ डिसेंबर २०१७ रोजी मतदान होईल, असेही श्री. सहारिया यांनी सांगितले.

**निवडणूक कार्यक्रमाचा तपशील:**

- **नामनिर्देशनपत्रे सादर करणे-** २३ नोव्हेंबर २०१७ ते २८ नोव्हेंबर २०१७
- **नामनिर्देशनपत्रांची छाननी-** २९ नोव्हेंबर २०१७
- **अपील नसल्यास उमेदवारी मागे घेणे-** ०४ डिसेंबर २०१७
- **अपील असल्यास उमेदवारी मागे घेणे-** ०७ डिसेंबर २०१७
- **मतदानाचा दिनांक-** १३ डिसेंबर २०१७
- **मतमोजणीचा दिनांक-** १४ डिसेंबर २०१७

०-०-०

(Jagdish More, PRO, SEC)